# Promotion of Gender Equity, Green Campus, Clean Campus

## Different facilities provided for the girls




Instruction Boards



महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन

प्रतिनिधी, नाशिक

शहर परिसरातील महाविद्यालयांमध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून विद्यार्थ्यांच्या या उपक्रमांसाठी प्राध्यापकांकडून मार्गदर्शन केले जात आहे.

भोसला महाविद्यालयातर्फे स्वच्छता मोहीम

भोसला सैनिकी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय छात्र सेना आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या सहकार्याने 'स्वच्छता हीच सेवा' अंतर्गत आकाशवाणी येथील जॉगिंग ट्रॅक येथे स्वछता करण्यात आली. नगरसेवक मुन्ना हिरे यांनी स्वच्छता मोहिमेचे उद्‌घाटन करून सहभागी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. त्यांनी स्वयंसेवकांना स्वच्छतेचे महत्त्व आणि गरज पटवून दिली. या मोहिमेत सुमारे ३०० स्वयंसेवकांसह महाविद्यालयातील अन्य विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारीही सहभागी होते. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी भारत गुगाने, राष्ट्रीय छात्र सेना अधिकारी मेजर विक्रांत कावळे, लेफ्टनंट योगेश भदाणे यांनी मार्गदर्शन केले. जॉगिंग ट्रॅकची स्वच्छता झाल्यामुळे परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

शैक्षणिक

महिला महाविद्यालयात पालक-शिक्षक सभा

एस. एम. आर. के. महिला महाविद्यालयात पालक-शिक्षक सभेचे आयोजन करण्यात आले होते. सभेच्या सचिव छाया लोखंडे यांनी प्रास्ताविक केले. कनिष्ठ महाविद्यालयाचे समन्वयक शिरीष दडके यांनी महाविद्यालयाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. सभेत नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

प्राचार्या डॉ. दीप्ती देशपांडे यांची अध्यक्ष, तर उपाध्यक्ष म्हणून विजय जोशी, सचिव म्हणून छाया लोखंडे यांची निवड झाली. रोखपाल प्रशांत आंबेकर यांनी शैक्षणिक शुल्काचा आराखडा सादर केला.

प्राचार्या देशपांडे यांनी विद्यार्थिनींचे दर्जेदार शिक्षणातून सबलीकरण करण्याचे ध्येय स्पष्ट केले. स्नेहा रत्नपारखी यांनी सूत्रसंचालन केले, तर प्रियंका बच्छाव यांनी आभार मानले.

केटीएचएममध्ये 'ह्युमन लायब्ररी'चे उद्‌घाटन

के. टी. एच. एम. महाविद्यालयात प्राचार्य डॉ. व्ही. बी. गायकवाड यांच्या उपस्थितीत 'ह्युमन लायब्ररी' उपक्रमाचे उद्‌घाटन झाले. कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. एम. बी. मत्सागर, डॉ. तुषार पाटील उपस्थित होते. 'ह्युमन लायब्ररी' ही एक अनोखी संकल्पना असून यामध्ये पुस्तकांची जागा माणसे घेतात. ही माणसेच स्त्रोत अथवा लिव्हिंग बुक होऊन रूढीबद्ध धारणा आणि परंपरांना चर्चेद्वारे, प्रश्नांद्वारे आव्हान देतात. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये मानवता रुजावी, देश आणि समाजबांधणीत त्यांनी हातभार लावावा, असे आवाहन डॉ. गायकवाड यांनी केले.

Cleanliness Drive – News







Solar Panels

| | |
|---|---|
|  |  |
| **Solar Power System** | **LED Lights** |
|  |  |
| **Dustbins in Campus** | **Garbage Collection Van** |

| | |
|---|---|
|  |  |

**Rainwater Harvesting**